# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ६२०/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- २४/११/२०१८

## "अल्पवयीन मुलीला पळवुन नेणाऱ्या आरोपीस एक वर्ष कारावास व द्रवदंडाची शिक्षा "

**पोलीस ठाणे साकोली** :– आरोपी नामे १) मनोज हरीशंकरप्रसाद तिवारी वय २० वर्ष, रा. गोंडेगाव ता. बरघाट जिल्हा शिवनी (म. प्र) यांनी पोलीस स्टेशन साकोली स्थळ अंतर्गत अल्पवयीन मुलीला तिच्या पालकांच्या रखवालीतुन पळवुन नेल्याचा आरोप सिध्द् झाल्याने दिनांक २१/११/२०१८ रोजी **श्री. आर. पी. पांडे सा.अतिरीक्त सत्र न्यायाधिश सत्र न्यायालय भंडारा** यांनी सदर आरोपी यास कलम ३६३ भा.द.वी. मध्ये १ वर्ष कारावास व ५०००/–रू. दंड,दंड न भरल्यास ३ महिणे कारावास शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक १६/०२/१७ ला तक्रारदार वय ४० वर्ष हिने पोलीस ठाणे साकोली येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, दिनांक १५/०२/१७ रोजी ०९.०० च्या दरम्यान तक्रारदार यांची मुलगी वय १५ वर्ष, ही शाळेत जातो म्हणुन १०:००वा.सुमारास निघुन गेली त्याच सुमारास तक्रारदार सुध्दा मजुरीचे कामाला गेली. मजुरीचे काम करुन सायकांळी ५.३० वाजता सुमारास घरी आली तेव्हा मुलगी ही शाळेमधुन घरी परत आली नाही. तेव्हा मुलीबाबत आजुबाजुला राहणारे घरा शेजारील लोकांना विचारपुस केली. पंरतु अल्पवयीन मुलीचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. मुलगा हा तक्रारदार यांची सासु हिचेकडे १५ दिवसा पासुन पाहुणा म्हणुन राहत होता त्या दरम्यान तो सुध्दा घरी हजर नव्हता यावरून आरोपी नामे मनोज हरीशंकरप्रसाद तिवारी वय २० वर्ष, रा. गोंडेगाव ता. बरघाट जिल्हा शिवनी (म. प्र) अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन तक्रारदारांच्या कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे. अशी तोंडी तक्रार पोलीस स्टेशन साकोली येथे दिल्यावरून आरोपी विरूध्द् अपराध क्रमाक ५९/२०१७ कलम ३६३,३६६(A) भा.द.वी ८ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार माधव परशुरामकर पो. स्टे. साकोली यांनी गुन्हयात आरोपी नामे १) मनोज हरीशंकरप्रसाद तिवारी वय २० वर्ष, रा. गोंडेगाव ता. बरघाट जिल्हा शिवनी (म. प्र) २) रविप्रसाद लिख्खनप्रसाद तिवारी वय ५६ वर्ष, रा. रेंगाटोला ह. मु. चंगेरा/ बेनी ता. वाराशिनी

जि. बालाघाट (म. प्र) यांना कायदेशिर अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने गुन्हयात कलम ३४ भा.द.वी वाढ करून दोंन्ही आरोपीतांन विरूध्द् आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस.क्र. २५/१७अन्वये खटला सुनावनी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी मा. **श्री. आर. पी. पांडे सा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश सत्र न्यायालय भंडारा** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **अॅडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन गुन्हयातील साक्षदार तपासले, दिनांक २१.११. २०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन गुन्हयातिल आरोपी क्र. १ नामे मनोज हरीशंकरप्रसाद तिवारी वय २० वर्ष, रा. गोंडेगाव ता. बरघाट जिल्हा शिवनी (म. प्र) यांचे विरूध्द आरोपसिध्द् झाल्याने कलम ३६३ भा.द.वी.अन्वये मध्ये १ वर्ष कारावास व ५०००/—रू. द्रव्यदंड दंड न भरल्यास ३ महिणे कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक रामेश्वर पिपरेवार ठाणेदार पो.स्टे.साकोली यांचे मार्गदर्शनात पोलीस नायक विनोद बघेले यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.